# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
यांचेकार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणेदुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्र-१६७ दिनांक -०१/०५/२०२४

## ०१ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधुन तुळींज पोलीस ठाणे प्रॉपर्टी मिसींग मधील एकुण २,५०,०००/- रुपये किंमतीचे २५ मोबाईल फोन तक्रारदार यांना परत देवुन उल्लेखनिय कामगिरी केलेबाबत.

तुळींज पोलीस ठाणे हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात दाट लोकवस्तीचे तसेच गर्दीचे ठिकाणे असुन, दैनंदिन कामाचे घाईगडबडीमध्ये रेल्वे स्टेशन परिसर तसेच सेंट्रल पार्क, ओसवाल नगरी आठवडा बाजार येथे लोकांचे मोबाईल फोन गहाळ झालेबाबत पोलीस ठाणे तसेच ऑनलाईन तक्रारी प्राप्त होत असतात. मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार तुळींज पोलीस ठाणेत दाखल प्रॉपर्टी मिसींगमधील गहाळ मोबाईल यांचा तांत्रिक माहितीच्या आधारे शोध घेवुन, ०१ मे २०२४ रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधुन, पोलीस ठाण्यात नाविण्यपुर्ण उपक्रम राबवुन प्रॉपर्टी मिसींग मधील विविध कंपन्यांचे एकुण २,५०,०००/- रुपये किंमतीचे एकुण २५ मोबाईल तक्रारदार यांना मा. वरिष्ठांच्या हस्ते परत दिले आहेत. सदर बाबत तक्रारदार यांनी त्यांचा गहाळ झालेला मोबईल फोन परत मिळाल्याने समाधान व्यक्त करुन, पोलीसांचे कामगिरीचे कौतुक केले आहे.

सदरची कामगीरी श्री. पौर्णिमा चौगुले- श्रींगी पोलीस उप आयुक्त साो, परीमंडळ-२ वसई, श्री. उमेश माने-पाटिल सहाय्यक पोलीस आयुक्त साो, तुळींज विभाग, तुळींज पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सहा.पोलीस निरिक्षक श्री. सुनिल पवार, पोउनिरी/बाळासाहेब बांदल, पो.हवा/०६०७१ आनंद मोरे, पोहवा/०७०९८ उमेश वरठा, पोहवा/१२०३१ आशपाक जमादार, पोहवा/१२०६२ पांडुरंग केंद्रे, पोशि/ १३०५२ छपरीबन, पोशि/शशिकांत पोटे, पोशि/१४१५४ राहुल कदम तसेच पोलीस उपायुक्त कार्यालय परिमंडळ -०२ नेमणुकीतील पोहवा/०००४ बागुल, पोशि/१४१७२ अमोल बर्डे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.






MAHARASHTRA
POLICE

